जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2023
पुण्यनगरी

# ॲड. गुंडे यांची विद्यापीठास भेट

**कोल्हापूर :** राष्ट्रीय अल्पसंख्याक आयोगाचे सदस्य ॲड. धन्यकुमार गुंडे यांनी शिवाजी विद्यापीठास सपत्नीक सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी आपल्या दालनामध्ये शाल, स्मृतिचिन्ह व ग्रंथ भेट देऊन स्वागत केले. तर निर्मला गुंडे यांचाही सत्कार केला. ॲड. गुंडे म्हणाले, शिवाजी विद्यापीठाचे माजी विद्यार्थी असल्याचा मला अतिशय अभिमान आहे. तसेच देशातील विद्यार्थ्यांमध्ये 'राष्ट्र प्रथम' ही सर्वोच्च भावना रुजविण्यासाठी सातत्याने प्रबोधन व कार्य करत असल्याचेही त्यांनी सांगितले. शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाच्या कार्याविषयीही त्यांनी कौतुकोद्गार काढले. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी, विद्यापीठातील सामाजिक वंचितता व समावेशन धोरण केंद्र, लोकविकास केंद्र आदी केंद्रांच्या माध्यमातून अल्पसंख्याकांसह वंचित घटकांच्या उत्थानाच्या अनुषंगाने अभ्यास व संशोधन करण्यास विद्यापीठाचे प्राधान्य असल्याचे सांगितले. या भेटीनंतर ॲड. गुंडे यांनी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनाचे कार्य, संशोधन आणि प्रस्तावित इमारत प्रकल्पाची माहिती घेतली. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, डॉ. विजय ककडे, महावीर अध्यासनाच्या सल्लागार समितीचे सदस्य अनिल पाटील, डी. ए. पाटील, डॉ. चंद्रकांत चौगुले आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

22 DEC 2023 लोकमत



शिवाजी विद्यापीठातील भूगोल अधिविभागाचे निवृत्त विभागप्रमुख डॉ. ॲड. राम पणदूरकर व त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शनमधील बचतीतून साठविलेली ३५ लाख रुपयांची पुंजी दिवंगत कन्या डॉ. ॲड. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांच्याकडे शुक्रवारी सुपूर्द केली. या देणगीमधून विद्यापीठात विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र अभ्यासिका बांधण्यात येणार आहे. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, वरदराज बापट, प्रा. एस.के. पवार, ॲड. अमोल रणसिंग उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2023

पुण्यनगरी



# शिवाजी विद्यापीठास ३५ लाखांची देणगी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचे निवृत्त भूगोल अधिविभाग प्रमुख डॉ. राम पणदूरकर, त्यांच्या पत्नी हेमकिरण यांनी पेन्शन बचतीतून साठविलेले ३५ लाख रूपये आपले एकमेव अपत्य दिवंगत डॉ. रूपाली पणदूरकर यांच्या स्मरणार्थ कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याकडे सुपूर्द केली. या देणगीमधून शिवाजी विद्यापीठातील 'कमवा व शिका' विद्यार्थिनी वसतिगृह परिसरात स्वतंत्र अभ्यासिका बांधण्यात येणार आहे. नवीन वर्षात ही अभ्यासिका साकार होईल. ॲड. पणदूरकर यांनी सर्व शिक्षण शिवाजी विद्यापीठातून पूर्ण केले. वयाच्या अवघ्या ३० व्या वर्षी त्यांनी 'महाराष्ट्रातील बालगुन्हेगारीचा सामाजिक व कायदेविषयक अभ्यास' या विषयावर शोधप्रबंध सादर करून कायदे विषयात पीएच.डी. मिळविली होती. त्यांची उद्या (दि. २२ डिसेंबर) जयंती आहे. या जयंतीच्या पूर्वसंध्येला देणगीचा धनादेश सुपूर्द केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे, स्वागत परुळेकर, वरदराज बापट, प्रा. एस. के. पवार, ॲड. अमोल रणसिंग उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

22 DEC 2023 क्रांतीसिंह शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिक्षणातच परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्यः डॉ. एस. एस. मंथा

# विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ उत्साहात



कोल्हापूर(प्रतिनिधी):- परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रत्येक कृती परिवर्तनाला हातभार लावणारी असली पाहिजे. आयुष्यात मोठी ध्येये व स्वप्ने पाहा, अपयशाला स्वीकारा, त्यातून शिका, यशाची नवीन शिखरे गाठा. समाजामध्ये विद्यापीठाची प्रतिमा तयार करण्यासाठी राजदूत बनून योगदान द्यावे, असे प्रतिपादन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. एस. एस. मंथा यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचा ६० वा हीरकमहोत्सवी दीक्षांत समारंभ सोमवारी राजमाता जिजाऊसाहेब बहुद्देशीय सभागृहात झाला. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. एम.ए. मास कॉम अधिविभागाची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी हिला राष्ट्रपती सुवर्णपदक, तर जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूरची विद्यार्थिनी बिल्कीस गवंडी हिला कुलपती सुवर्ण पदक प्रदान करण्यात आले. यासह ४७ पीएच.डी. पदव्या आणि १८ पारितोषिके प्रदान करण्यात आली.

डॉ. मंथा म्हणाले, यूएस, यूके, जर्मनी व इतर समकक्ष देश विद्यापीठांचे रँकिंग सुधारण्यासाठी दीर्घकालीन व सातत्यपूर्ण प्रयत्न करीत आहेत. बदलत्या शैक्षणिक परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता देशातील विद्यापीठांनी विकसित करावी. विद्यापीठांनी सक्रियपणे विद्यार्थी उद्योजकतेला समर्थन देणारे वातावरण जोपासावे. स्टार्टअप्स यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांमुळेच विद्यापीठे नावीन्यपूर्ण, व्यावहारिक कौशल्य विकासाला चालना देणारी ठरतील. नवीन वस्तू किंवा नवीन पद्धत बनवणे म्हणजे नवनिर्मिती नाही. त्यासाठी वेगळी मानसिकता असायला हवी. जी सतत सुधारण्याचा, वातावरणाशी जुळवून घेण्याचा आणि सकारात्मक बदल घडवण्याचा प्रयत्न करत राहील. ही प्रक्रिया आत्मसात कशी करावी, हे ऋग्वेदात सांगितल्याचे ते म्हणाले.


डॉ. मंथा म्हणाले, विविध पार्श्वभूमी असलेल्या, विविध विषयांवर काम करणाऱ्या व्यक्ती जेव्हा एकत्र येतात, तेव्हा क्रांतिकारी कल्पनांचा उदय होतो. विविध दृष्टिकोन स्वीकारण्याच्या क्षमतेमुळेच प्रगती होते. ॲलन मस्क सुरुवातीच्या काळात संघर्षशील उद्योजक होते. त्यांनी दूरदृष्टी ठेवून अंतराळ संशोधनात काही तरी मोठे करण्याचे धाडस दाखवले. त्यामुळे तो जगातील मोठ्या श्रीमंतांच्या यादीत आहे.

ज्ञानाची अपराविद्या व पराविद्या ही दोन रूपे आहेत. येणाऱ्या आव्हानांसाठी विद्यार्थ्यांनी तयार असले पाहिजे. केवळ पदवी मिळवण्याशी संबंधित राहू नये. चांगला दृष्टिकोन व व्यापक उद्देश ठेवून कार्य केल्यास इतरांपेक्षा गर्दीत वेगळे दिसाल. स्वप्ने पाहण्याचे, ती सत्यात उतरवण्याचे आणि भविष्य घडविण्याचे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून विद्यार्थ्यांनी मार्गक्रमण करावे. परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य शिक्षणात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची प्रत्येक कृती परिवर्तनाला हातभार लावणारी असेल.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, स्पर्धेचे नवीन जग वेगवान आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवीबरोबर तंत्रकौशल्ये विकसित करावी लागतील. प्रत्येकाचा शैक्षणिक प्रवास सारखा नसतो. संघर्ष व खडतर प्रवासातून पोहोचल्यावरच यशाला वेगळी किनार येते. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून निष्ठेने प्रामाणिक प्रयत्न केल्यास यश मिळेल. विद्यार्थ्यांनी ज्ञानी व शहाणे व्हावे, असेही ते म्हणाले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी वार्षिक अहवाल सादर केला. परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी पदवी, प्रमाणपत्रे व पदविकांची माहिती सादर केली. नंदिनी पाटील, धैर्यशील यादव यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी शाहू महाराज, ज्येष्ठ नेते व्यंकाप्पा भोसले, प्रा. किसन कुराडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

***डिजिटल शिक्षण नवीन प्लॅटफॉर्म तयार करा*-प्रत्येक उत्तम विद्यापीठाची स्वतःची विशिष्ट शक्तिस्थळे, विशिष्ट दृष्टिकोन असतात. शैक्षणिक उत्कृष्टता, संशोधन व नावीन्य, जागतिक प्रतिष्ठा, वैविध्यपूर्ण आणि प्रतिभावान विद्यार्थी, माजी विद्यार्थ्यांचे मजबूत जाळे ही वैशिष्ट आहेत. जीडीपीच्या १.४ टक्के खर्च उच्च शिक्षणावर केला जातो. अशा स्थितीत विद्यापीठांनी तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याबरोबरच डिजिटल शिक्षण अभ्यासक्रमातील नवीन प्लॅटफॉर्म तयार करून शैक्षणिक प्रगती साधावी, असे डॉ. मंथा यांनी सांगितले.*

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC २०२२
पुण्यनगरी



# विकसित भारताचे स्वप्न नॅनोमटेरिअल साध्य करेल

## प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शाश्वत विकास हाच पृथ्वीच्या संवर्धनाचा उपाय असून, भौतिक प्रगतीच्या हव्यासाने संपूर्ण मानवजातीलाच धोका निर्माण झाला आहे. विकसित व आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण होण्यासाठी नॅनोमटेरिअल क्षेत्रातील संशोधन आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले.

रसायनशास्त्र विभाग, न्यू कॉलेज कोल्हापूर आणि यशवंतराव पाटील सायन्स कॉलेज, सोळांकूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नॅनोमटेरिअल फॉर एनर्जी अँड इनव्हायरमेंट' या विषयावरील सहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगचे चेअरमन के. जी. पाटील होते.

स्वागत व प्रास्ताविक न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी केले. परिषदेचे समन्वयक डॉ. ए. डी. चौगुले यांनी मनोगतामध्ये परिषदेच्या आयोजनाचा विषय स्पष्ट केला. या वेळी १०० हून अधिक संशोधकांचे शोधनिबंध असणाऱ्या 'सोव्हेनिअर'चे प्रकाशन करण्यात आले. सह समन्वयक डॉ. आर. बी. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2023
तरूण भारत

# शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आज

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाची अधिसभा आज (दि. २२) १२ वाजता राजर्षी शाहू सभागृहात सुरू होणार आहे. या अधिसभेत विद्यार्थी हित लक्षात घेवून क्रीडा विभाग, परीक्षेतील प्रश्न आणि नवीन शैक्षणिक धोरणावरही चर्चा होणार आहे. ही अधिसभा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

परिनियम व विनिमयाचे विद्यापीठाचे निदेश पुस्तक तयार आहे किंवा नाही, संशोधक विद्यार्थ्यांना फेलोशिपसाठी विद्यापीठ काय प्रयत्न करीत आहे. नवीन शिक्षण कायद्याच्या अंमलबजावणीसाठी काय प्रयत्न सुरू आहेत. विद्यापीठ परिक्षांमध्ये एसआरपीडीची प्रक्रिया सुरळीत पार न पाडणाऱ्या महाविद्यालयांबद्दल काय कारवाई सुरू आहे. पीएच. डी. प्रवेश कोर्स वर्क परीक्षेबाबत सोशल मिडीयावरून विद्यापीठाची बदनामी होत आहे काय? आदी प्रश्न विचारले जाणार आहेत. त्याचबरोबर विद्यापीठ कार्यक्षेत्रातील स्वायत्त व संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना सहज प्रवेश घेता यावेत



- **शैक्षणिक, क्रीडा, संशोधन, परीक्षेसंदर्भात ठरावावर होणार चर्चा**

म्हणून परीक्षा नियमावलीत संयुक्तीक बदल करावेत. विद्यापीठ क्रीडा स्पर्धांमध्ये नेटबॉल हा प्रकार सुरू करावा. मायग्रेशन सर्टीफिकेट मिळण्याबाबत अडचणी कमी व्हाव्यात. विद्यार्थ्याने कोणत्या माध्यमातून पदवी प्राप्त केली याचा स्पष्ट उल्लेख व्हावा. सिमावर्ती भागातील महाविद्यालयात कन्नड माध्यमातून पदवीचे शिक्षण घेण्याची व्यवस्था करावी. इमारतींचे स्ट्रकचरल ऑडीट करावे. क्रीडा मैदानावर हायमास्ट लाईटची व्यवस्था करावी. यासह अन्य ठरावही मांडले जातील. दरवर्षीप्रमाणे यंदाही अधिसभा शांततेत होणार की गोंधळ होणार? याकडे लक्ष लागले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2023
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाची आज अधिसभा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाची अधिसभा शुक्रवारी (दि. २२) दुपारी १२ वाजता राजर्षी शाहू सभागृहात सुरू होणार आहे. अधिसभेत क्रीडा विभाग, परीक्षेतील प्रश्न आणि नवीन शैक्षणिक धोरणावर चर्चा होणार आहे. अधिसभा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे.

परिनियम व विनियमाचे विद्यापीठाचे निदेश पुस्तक, संशोधक विद्यार्थ्यांसाठी फेलोशिप, राष्ट्रीय नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी, पीएच.डी. प्रवेश कोर्सवर्क आदी विषयांवरील प्रश्न विचारले जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 DEC 2023
पुढारी



# हिवाळी सत्रातील २६२ परीक्षांचे निकाल घोषित

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

शिवाजी विद्यापीठाच्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमधील हिवाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर २६२ अभ्यासक्रमांचे निकाल आजअखेर घोषित करण्यात आले आहेत.

विद्यापीठ हिवाळी सत्र अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरू आहेत. गुरुवारी मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन, मास्टर ऑफ सायन्स, बॅचलर ऑफ टेक्नॉलॉजी, मास्टर ऑफ जर्नालिझम, मास्टर ऑफ आर्टस् आदी अभ्यासक्रमांची परीक्षा वर्णनात्मक पद्धतीने झाल्या.

परीक्षेला ९४३ विद्यार्थी उपस्थित होते. दरम्यान, दि. २१ रोजी बीएस्सी., एम.एस्सी. (इकोनॉमिक्स), फूड सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम.ए.(मराठी), फूड सायन्स अँड न्यूट्रीशन, बी.एस्सी. (ॲनिमेशन), बी.एस्सी.(आयटी) आदी २५ अभ्यासक्रमांचे निकाल घोषित करण्यात आल्याची माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

22 DEC 2023

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ फुटबॉल संघात कमला कॉलेजच्या खेळाडूंची निवड



शिवाजी विद्यापीठ महिला फुटबॉल संघात निवड झालेल्या कमला कॉलेजच्या खेळाडू-सोबत शारीरिक शिक्षक संचालक ज्योती गावडे व प्रशिक्षक रघूनाथ पाटील.

प्रतिनिधी
कोल्हापूर

ग्वाल्हेर (मध्यप्रदेश) येथील आयटीएम विद्यापीठाच्या मैदानात होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला फुटबॉल स्पर्धेत प्रतिनिधीत्व करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघात कमला कॉलेजच्या पाच महिला खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. गोलरक्षक स्नेहल सुतार, सानिका पाटील, शर्वरी डोणकर, राजनंदिनी भोईटे, शिवानी पाटील अशी निवड झालेल्या महिला खेळाडूंची नावे आहेत.

गडहिंग्लजमध्ये नुकतीच शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय महिला फुटबॉल स्पर्धा झाली होती. या स्पर्धेत कमला कॉलेजच्या संघातून प्रतिनिधीत्व करताना स्नेहल, सानिका, शर्वरी, राजनंदिनी व शिवानीने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले होते. तसेच कमला कॉलेजच्या संघाला स्पर्धेच्या अंतिम सामन्यापर्यंत पोहोचण्यात मोलाचा वाटा उचलला होता. त्याचीच दखल घेऊन निवड समितीने या पाचही जणींना ग्वाल्हेरमध्ये २२ ते २६ डिसेंबर या कालावधीत होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ महिला फुटबॉल स्पर्धेसाठी निवडलेल्या शिवाजी विद्यापीठ संघात स्थान दिले आहे. या खेळाडूंना अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, शारीरिक शिक्षक संचालक ज्योती गावडे व प्रशिक्षक रघू पाटील यांचे मार्गदर्शन लाभत आहे.